वाचले : १. दिनांक - १३.२.२००२ ची मंजूर टिपणी.

---

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी - ४११ ०१८**
**करआकारणी व करसंकलन विभाग,**
**क्रमांक :** कर/मुख्य/६/कावि/२३२/२००२.
**दिनांक :** १३/०३/२००२.

**विषय : करआकारणी व करसंकलन विभागाचे कामकाजासाठी**
झोनिंग पाडणेबाबत

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाचे नियंत्रणाखाली संपूर्ण महापालिका क्षेत्राची १५ विभागीय कार्यालयात विभागणी करणेत आलेली आहे. या १५ विभागात करआकारणी व वसूली कामाकरिता १३१ गट पाडलेले आहेत. सध्या संपूर्ण महापालिका क्षेत्रात मिळकतीचा बांधकाम प्रकार, वर्षे विचारात घेऊन एकाच दराने करपात्र मूल्य ठरावणेची कार्यपध्दती अस्तित्वात आहे.

मात्र सन १९९७ पासून महापालिका क्षेत्रात नव्याने काही गावे समाविष्ट झालेली आहेत. तसेच काही जुन्या हद्दीचा भाग अविकसनशील आहे. त्यामुळे सध्याचे आकारणीचे पध्दतीनुसार काही मिळकतधारकांवर अन्याय होत आहे. कारण नवीन समाविष्ट गावामध्ये अद्याप नागरी सुविधा पूर्णपणे उपलब्ध नाही. तसेच काही अविकसनशील भागातही ही परिस्थिती आहे. त्यामुळे संपूर्ण महापालिका क्षेत्राची विभागणी त्या त्या विभागातील इमारतीचा बांधकाम प्रकार, वर्षे, नागरी सुविधा व सेवा लक्षात घेऊन प्रति मासिक भाडे करिता तेथील प्रती चौरस फूटाचे भाडे दर ठरविणेकामी महापालिका परिसराचे झोनिंग करणे आवश्यक आहे. याबाबत मा. उपसंचालक नगररचना व विभागीय कार्यालयाचे शाखाप्रमुख यांचे अभिप्राय, महापालिका हद्दीची भौगोलिक परिस्थिती, असलेल्या नागरी सुविधा व सेवा या सर्व बाबींचा विचार करणेत येऊन तीन गटात झोनिंग करणे आवश्यक आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८ या आदेशान्वये करआकारणी व करसंकलन विभागाचे कामकाजाकरिता महापालिका क्षेत्राची "अ" "ब" "क" या तीन झोन मध्ये खालीलप्रमाणे झोनिंग करणेस व त्यानुसार करआकारणीचे कामकाज करणेस मान्यता देत आहे.

| झोन | समाविष्ट कार्यक्षेत्र/विभाग | समाविष्ट गट क्रमांक |
|---|---|---|
| "अ" | निगडी प्राधिकरण | सर्व गट |
| | आकुर्डी | सर्व गट |
| | चिंचवड | सर्व गट |
| | पिंपरी वाघेरे | सर्व गट |
| | पिंपरी नगर | सर्व गट |
| | मनपाभवन | सर्व गट |
| | फुगेवाडी-दापोडी | सर्व गट (नव्याने समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) |
| | भोसरी | सर्व गट (नव्याने समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) |
| "ब" | सांगवी | सर्व गट (नव्याने समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) |
| | थेरगाव | सर्व गट (नव्याने समाविष्ट झालेला ग्रामीण भाग वगळून) |

[कृ.मा.पहा]

| झोन | समाविष्ट कार्यक्षेत्र/विभाग | समाविष्ट गट क्रमांक |
|---|---|---|
| "क" | सांगवी | ९. रक्षक सोसायटी |
| | थेरगाव | ७. भुजबळ वस्ती<br>८. वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती<br>९. पुनावळे गावठाण |
| | फुगेवाडी-दापोडी | ७. बोपखेल |
| | भोसरी | १५. साईपार्क आदर्शनगर<br>१६. दिघी गावठाण<br>१७. गजानन महाराज मंदिर |
| | चऱ्होली | सर्व गट |
| | मोशी | सर्व गट |
| | चिखली | सर्व गट |
| | तळवडे | सर्व गट |
| | किवळे | सर्व गट |
| | झोपडपट्टया | सर्व विभागातील झोपडपट्ट्या |

वरील प्रमाणे झोनिंग सर्व शाखाप्रमुखांनी विचारात घ्यावे व कामकाज करावे.

सूचना :

१. झोपडपट्टी क्षेत्राबाबत ज्या विकसनशील भागात अविकसित झोपडपट्टी येते अशा झोपडपट्टीला लागून असलेल्या विकसनशील भागातील मिळकतींवर आकारणी करताना सदर मिळकत झोपडपट्टी क्षेत्रात समाविष्ट होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. नव्याने समाविष्ट झालेल्या ग्रामीण भागा बाबतच्या मिळकतीबाबतही थेरगाव, सांगवी, फुगेवाडी-दापोडी, भोसरी या विभागाचे प्रमुखांनी वरीलप्रमाणे झोनिंगनुसार मिळकतीवर आकारणी करणेची दक्षता घ्यावी.
३. करयोग्यमूल्य निश्चितीसाठी दरपत्रक अलहिदा पाठविणेत येत आहे.
४. वरीलप्रमाणे झोनिंग पध्दत आदेशाची तारखेपासून आकारणी होणाऱ्या मिळकतींसाठी लागू असेल.

**सही/-**

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१. मा. उपसंचालक नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

२. सहाय्यक मंडलाधिकारी
---------------------- विभाग.

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त (करसंकलन)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.